॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. १० :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रातर्फे आज 'विश्व हिंदी दिवस' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथील माजी हिंदी विभाग प्रमुख प्रा. डॉ. व्ही. एन. भालेराव यांचे वैश्विक स्तरपर हिंदी के बढ़ते कदम और रोजगार के अवसर' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रम प्रसंगी भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्राचे संचालक माननीय प्रा. डॉ. म. सु. पगारे यांनी अध्यक्षस्थान भूषविले.

आजपर्यंत हिंदी ने भारतातील प्रांतिक भेदाला एकत्रित समन्वयाने जोडण्याची भूमिका निभावली आहे. असे असले तरी संविधानिक दृष्ट्या हिंदी भाषेला आजही राष्ट्रभाषेचा दर्जा मिळालेला नसल्याने हिंदी भाषा समृद्ध असूनही युनो पर्यंत पोहोचू शकत नाही. परंतु तरीदेखील १९७५ मध्ये झालेल्या पहिल्या विश्व हिंदी संमेलनाने हिंदी भाषेला वैश्विकीकरणाकडे न्यायला मदत मिळाली असल्याचे विवेचन करत प्रमुख वक्ते प्रा. डॉ. व्ही. एन. भालेराव म्हणाले की, हिंदी भाषा ही साधी असल्याने ती संपर्क आणि समन्वय करण्यासाठी सोपी जाते. त्यामुळे प्रादेशिक भाषेच्या तुलनेत भारतात हिंदी बोलणाऱ्यांची संख्या अधिक आहे. हिंदीमध्ये रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. ज्यात बँकिंग क्षेत्रात हिंदी भाषेचा अधिकारी म्हणून तसेच हिंदी चित्रपट व्यवसायात पटकथा लेखक, अनुवादक, कलाकार, डबिंग यासारख्या ठिकाणी हिंदी भाषेचे ज्ञान असलेल्यांना संधी उपलब्ध आहेत.

विश्व हिंदी दिनानिमित्ताने शुभेच्छा देत आपल्या अध्यक्षीय मनोगतातून प्रशाळेचे संचालक माननीय प्रा. डॉ. म. सु. पगारे म्हणाले की, भाषा भगिनी म्हणून हिंदी भाषेचे महत्त्व नक्कीच आहे परंतु एखाद्या प्रादेशिक भाषेवर अन्याय करून त्यावर दुसऱ्या भाषेची सक्ती व्हायला नको. प्रत्येक भाषा ही स्वतःमध्ये वैशिष्ट्यपूर्ण असते. रोजगारामध्ये भाषेला महत्त्व आहे. त्यात प्रामुख्याने अनुवादक, दुभाषा, पर्यटक मार्गदर्शक म्हणून करिअरला भविष्यात संधी आहे परंतु सर्वच भाषांमध्ये संवाद कौशल्य विकसित करता आले, तरच रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. कारण आज कायमस्वरूपाच्या नोकऱ्या जवळपास बंद झाल्या आहेत. त्यामुळे कौशल्याधारित नोकरीमध्ये देखील आज पाहिजे तेवढ्या प्रमाणात वेतन मिळत नसल्याचे दिसून येते. खूप स्पर्धा वाढली असल्याने भयावह परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उदासीनता आणि नैराश्याची स्थिती अलीकडे जास्त वाढत असल्याचे चित्र दिसते. त्याकरता सर्वप्रथम आपल्या अस्तित्वाची जाणीव झाली पाहिजे. जाणीव नसलेल्यांचा फायदा आज जिकडे तिकडे राज्यकर्त्यांकडून घेतला जात आहे आणि तरुण बेरोजगारीच्या समस्यांकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष होत आहे. अशी खंत यावेळी अध्यक्षांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केली.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ — दिनांक: १० जानेवारी, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता